स्थायी समितीच्या **मंगळवार** दिनांक **29–06–2010** रोजी सकाळी **11–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |
| 5. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 6. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 7. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 8. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 10. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 11. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |

रिक्त स्थान – 4

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 48</u> :– गांधीबाग उद्यानाचे प्रवेश शुल्क वसुल करण्याचा व उद्यानातील स्टॉलमध्ये पाकीट बंद खाद्यपदार्थ व शितपेयांची विक्रीचा अधिकार देऊन मोबदल्यात उद्यानाची तीन वर्ष कालावधीपर्यंत देखभाल करण्याकरिता वर्तमान पत्रात निविदा जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता मे. अनिल एल. चव्हाण, बोरगांव नागपूर यांची तीन वर्ष कालावधी करिता रु. 1,21,000/– रकमेची प्राप्त एकमेव निविदेस प्रपत्रातील नमूद अटी व शर्तीवर देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय एकमताने नामंजूर, यापूर्वी याच विषयाशी संबंधी काढलेल्या EO.I. 15 दिवसाचे आत स्थायी समिती समोर सादर करावा तसेच पूढील निर्णय होई पर्यंत जुन्या कंत्राटास मुदतवाढ देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 49</u> :– सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत बी.पी.एल. यादीमध्ये ज्या लाभार्थ्यांचे नांवे आहेत अश्या लाभार्थ्यांकरिता योजना समाज कल्याण व महिला बाल कल्याण विभागांमार्फत राबविण्यांत येत असून बी.पी.एल. धारकांच्या सोयीकरिता बी.पी.एल. कार्ड देणे अत्यंत आवश्यक असून 98966 बी.पी.एल. लाभार्थ्यांचे स्मार्ट कार्ड बनविण्याकरिता मे. नॅशनल ऍज्युकेशन रुपये 132/– प्रति नग प्रमाणे एकूण रुपये 1,30,63,512/– राशीचे प्राप्त निम्नतम निविदा दरावर सुधारित अंदाजपत्रकातील उपलब्ध तरतुदीचे अधिन राहून कार्यादेश निर्गमित करण्याच्या अटीवर मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय एकमताने नामंजूर, विभागाने सखोल अभ्यास करुन फेरनिविदा काढण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 50</u> :– नागपूर महानगरपालिकेचे सन 2010–2011 चे अर्थसंकल्पा चे पुस्तक , पेन व कॅरीबग कोम्बो पॅक सर्व मा. पदाधिकारी, नगरसेवक, पत्रकार व अधिकाऱ्यांना देण्याकरिता मे. गॅलक्सी एन्टरप्रायजेस नागपूर यांचे कडून प्रती पेन रुपये 474/– प्रमाणे एकुण 225, नग पारकर गोल्ड पेन व मे. आषुतोष नागपूर यांचे कडून प्रती कॅरीबग कोम्बो पॅक रुपये 8618/– प्रमाणे एकुण 225 , नग व्ही.आय.पी. कंपनीचे कॅरीबॅग मॉडेल नं. VIP ODYSSEY BT BC SM 41 cm x 31cm X 10 cm , VIP EVOS ( CARTON ) 52cm STOLLY 52 cm COMBO Pack खरेदी करण्याकरिता निविदा मंजुर करण्याचा व एकुण खर्च रुपये 106650 + 1939050 = 2045700/– ला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र. 25 मधुन करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 51</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग व झोनल कार्यालयामध्ये असलेली मालमत्तेची व इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरिता महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांचे कडुन

एकूण 06 पर्यवेक्षक 42 बंदुकधारी सुरक्षारक्षक व 135 बिनाबंदुकधारी सुरक्षारक्षक त्याच प्रमाणे एकूण 5 खाजगी सुरक्षा एजन्सी कडुन एकुण 40 बंदुकधारी सुरक्षागार्ड व 528 बिनाबंदुकधारी सुरक्षागार्ड स्थायी समिती ठराव क्र. 362 दि. 28.3.2008 व मा. निगम आयुक्त यांचे दि. 28.3.2008 आदेशाप्रमाणे लावण्यात आलेले आहे. या दोन्ही कंत्राटाची मुदत दि. 31.3.2010 ला संपुष्टात आली आहे.

नविन निविदा ची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे मा. आयुक्तांनी या कंत्राटाला दि. 1.4.2010 ते 31.5.2010 पर्यंत मुदत वाढ मंजुर केलेली आहे. व या कालावधीचा नविन निविदेची प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता सुचित केले आहे. मा. आयुक्त यांचे आदेशान्वये म.न.पा. तर्फे निविदेची जाहिरात क्र. 285/ई/पी.आर. दि. 24.3.2010 दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी करुन तसेच निविदा ची सुचना e- Tender online वर प्रसिध्दी करुन इंटरनेट व्दारा निविदा मागविण्यात आलेले आहेत.

एकूण सात निविदा e- Tender online व्दारा प्राप्त झाले होते त्या एकुण सात निविदापैकी खालील तीन निविदाधारकांनी निविदा त्या अटी शर्ती प्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांचे प्राईस बिड उघडण्यात आलेले नाही.

1. शिवा सिक्युिटी ॲन्ड पर्सनल सर्व्हिसेस , नागपूर
2. न्यु ज्वाला सिक्युरिटी सर्व्हिसेस , नागपूर
3. ईगल सिक्युिटी ॲन्ड पर्सनल सर्व्हिसेस , मुंबई

तसचे उर्वरित चार निविदाधारकांनी निविदाच्या अटी व शर्ती प्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केल्यामुळे त्यांचे प्राईस बिड (दर सुची ) उघडण्यात आले.

1. युनिटी सिक्युरिटी फोर्स , नागपूर
2. सुपर सिक्युरिटी सर्व्हिसेस , नागपूर
3. वनश्री इंटिलिजेंस सिक्युरिटी सर्व्हिसेस , नागपूर
4. किशोर एजेन्सीज, नागपूर

वरील चार सुरक्षा एजेन्सीचे दर समान असुन ते किमान वेतन दराप्रमाणे बरोबर आहेत व ते दर खालील प्रमाणे आहेत.

1. प्रति बंदुकधारी सुरक्षा गार्ड रु. 5838.63 प्रती महिना
2. प्रति बिना–बंदुकधारी सुरक्षा गार्ड रु. 5708.08 प्रती महिना

अ) वरील निविदा व्दार प्राप्त झालेले बंदुकधारी व बिनाबंदुकधारी सुरक्षा गार्ड चे दर किमान वेतन प्रमाणे बरोबर असल्यामुळे या दराला मा. आयुक्तांनी सुध्दा मान्यता दिलेली आहे. तरी या नविन दर कराराला सन 2010 –2011 व 2011 –2012 असे दोन आर्थिक वर्षाकरिता मान्यता देवून या नविन दराप्रमाणे म.न.पा. च्या विविध कार्यालय व मालमततेची देखभाल तसेच संरक्षण करण्याकरिता वरील एकूण चार निविदाधारकांकडून 40 बंदुकधारी सुरक्षागार्ड व 528 बिनाबंदुकधारी सुरक्षा गार्ड लावण्यासाठी व त्या करीता होणाऱ्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र.22 मधुन करण्यात येईल.

ब) स्थायी समिती ठराव क्र. 362 दि. 28.3.2008 प्रमाणे महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ पुणे (मेस्को) यांचे कंत्राटाला दि. 31.3.2010 पर्यंत मंजुरी होती. हा कंत्राट दि.

31.3.2010 जा संपुष्टात आल्यामुळे मा. आयुक्तांनी या कंत्राआला दि. 1.4.2010 ते 31.5. 2010 पर्यंत मुदतवाढ मंजूर केली व या दोन महिन्याच्या कलावधीमध्ये पुढील एका वर्षाकरिता मुदतवाढ मंजुरीकरिता वेगळा प्रस्ताव सादर करण्यात यावा. महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ पुणे (मेस्को) यांचे कंत्राटाची मुदतवाढ दि. 31.5.2010 ला संपुष्टात येणार असल्यामुळे या कंत्राटाला दिनांक 01.06.2010 ते 31.05.2010 पर्यंत असे एका वर्षापर्यंत जून्याच करारनामाच्या अटी व शर्ती प्रमाणे तसेच शासनाचे जे किमान वेतन राहील व इतर लागु असलेले भत्ते प्रमाणे एकुण 06 पर्यवेक्षक , 42 बंदुकधारी व 135 बिनाबंदुकधारी सुरक्षारक्षकाला मुदतवाढ व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र. 22 मधुन करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 52</u> :– नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोनल कार्यालयामध्ये दैनंदिन कामाकरिता लागणारी आवश्यक संगणकाची प्लेन व प्रि–प्रिन्टेट स्टेशनरी कंझुमेबलस व साहित्य नविन द्विवार्षीक दर करार निश्चित करण्याकरीता जाहिरात क्र. 245/ई./पी.आर./2010, दिनांक 16.02. 2010 अन्वये ई–निविदा सुचनांची जाहिरात Online वर व स्थानिक दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असता एकूण 4 निविदा धारकांनी ई–निविदा सादर केल्या व ते खालील प्रमाणे आहेत.

1. मेसर्स. सुदर्शन पेपर कन्व्हर्टींग वर्क्स, नागपूर.
2. मेसर्स. पी. ॲन्ड. जी. सेल्स कार्पोरेशन, नागपूर
3. मेसर्स. गॅलक्सी एन्टरप्रायजेस, नागपूर.
4. मेसर्स. व्ही. के. एस. ऑरगनायजेशन, नागपूर.

या निविदाधारकांपैकी मेसर्स व्ही. के. एस. ऑरगनायजेशन, नागपूर यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे आवश्यक कागदपत्रे बरोबर सादर न केल्यामुळे त्यांची दरसुची उघडण्यात आलेली नाही. तसेच मेसर्स. सुदर्शन पेपर कन्व्हर्टींग वर्क्स, नागपूर गॅलक्सी एन्टरप्रायजेस, नागपूर व मेसर्स पी. ॲन्ड. जी. सेल्स कार्पोरेशन, नागपूर यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रे बरोबर सादर केल्यामुळे त्यांची दरसुची उघडण्यात आली. त्यानुसार तुलनात्मक दराचा तक्ता तयार केला असता निविदेच्या अंतर्गत वेगवेगळया स्टेशनरी व साहित्याकरिता संबंधित निविदा धारकांचे वेगवेगळे दर असल्यामुळे प्रत्येक साहित्याकरिता विभागाला प्राप्त निम्नतम दर हे सिलींग दर म्हणून त्या त्या साहिज्याकरिता निश्चित धरण्यात येवून संगंणकाची प्लेन व प्रि–प्रिन्टेट स्टेशनरी कंझुमेबलस व साहित्याचे जे नविन निम्नतम दर मा. आयुक्त यांनी मान्य केले आहे. त्या दराप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग व झोनल कार्यालयाकरिता दोन वर्षाचे कालावधीकरिता (सन 2010–2011 व 2011–2010) 1) मेसर्स. सुदर्शन पेपर कन्व्हर्टींग वर्क्स, नागपूर 2) मेसर्स गॅलक्सी एन्टरप्रायजेस, नागपूर 3) मेसर्स. पी. ॲन्ड. जी. सेल्स कार्पोरेशन, नागपूर यांचेकडून खरेदी करण्यास्तव व येणारा खर्च प्रतिवर्ष रुपये 75 लाखा प्रमाणे दोन वर्षाकरीता रु. 150 लाखाच्या खर्चास

मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन (सन 2010–2011 व 2011–2011) ऐवजी 2011–2012 या दुरुस्ती सहीत एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 53</u> :– महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाअंतर्गत (1) गांधीसागर व (2) सोनेगांव सरोवर या दोन्ही सरोवराच्या पुनुरुज्जीवन करण्याकरीता अनुक्रमाने (1) रु. 1,78,51,211.00 व (2) रु. 3,24,83,758.00 म्हणजे एकुण रु. 5,03,34,969.00 चे प्राकलनास प्रशाकीय मान्यता देण्यात आली असून हया बाबतचे शासन निर्णय म.न.पा. ला प्राप्त झाले आहे. वरील प्रकल्पीय राशी च्या 70 टक्के रक्कम म्हणजे रु. 3,52,34,478.00 शासनाद्वारे वित्तीय अनुदानाचे स्वरुपात म.न.पा.ला मिळणे प्रस्तावित आहे. व 30 टक्के रक्कम म.न.पा. ना स्वतःचे वित्तीय स्त्रोतातून खर्च करावयाची आहे. जी रु. 1,51,00,490.70 एवढी आहे.

शासन निर्णय च्या अटी व शर्ती प्रमाणे प्रकल्पाचे कार्यान्वितीकरण करण्याकरिता पर्यावरणीय प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागारांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

गांधीसागर व सोनेगांव सरोवर याचे पुनुरुज्जीवन प्रकल्पाला कार्यान्वित करण्याकरिता तसेच वेळोवेळी प्रस्तावित इतर सरोवर व नदयांचे प्रकल्प मंजूर झाल्यावर त्यांना राबविण्याकरीता पर्यावरणीय प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागारांची नियुक्ती रितसर निविदा बोलवुन करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच सध्यः दोन सरोवरांचे प्रकल्पांचे अनुषंगाने रु. 20.00 लक्षाचे अदांज पत्रकांना मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 54</u> :– नागपूर महानगरपालिकेचे बाजार विभागा अंतर्गत येण–या सायकल/स्कुटर स्टॅन्ड बाबत वाहनाचे आकारावयाचे दर फार कमी असल्याने स्टॅन्ड ठेक्या बाबत अनेकदा निविदा मागवुन सुध्दा प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, ज्या प्रमाणे नागपूर सुधार प्रन्यास ' कार्यालयात दर आहेत, त्याप्रमाणे म्हणजेच (1) सायकल रू. 2/– (2) मोटार सायकल/स्कुटर रू. 5/– व (3) कार/जीप रू. 10/– नुसार वाहनांचे आकारावयाचे दरा बाबत बाजार विभागाचे स्टॅन्ड ठेक्याबाबत तसेच Non - Hawking Zone क्षेत्रात बोलवायच्या 'Pay & Park' निविदा प्रक्रियेत परवानगी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | सध्याचे दर | परवानगी पाहिजे असलेले दर |
|---|---|---|---|
| 1) म.न.पा. चे ज्या कर्मचा–यांनी | प्रति सायकल | 2.00 रूपये | 10.00 रूपये |
| मासिक पास काढली असेल त्यांच्या | दरमहा | (दोन रूपये) | ( दहा रूपये ) |
| कडून | प्रति स्कुटर | 5.00 रूपये | 20.00 रूपये |
| | दरमहा | (पांच रूपये) | ( वीस रूपये ) |
| 2) म.न.पा चे ज्या कर्मचा–यानी | प्रति सायकल | 0.50 पैसे | 1.00 रूपये |
| मासिक पास काढली नसेल अंशा कडून | | (पन्नास पैसे) | ( एक रूपये ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रति स्कुटर<br>प्रति दिन | 1.00 रूपये<br>(एक रूपये) | 2.00 रूपये<br>( दोन रूपये ) |
| 3) शहरातील इतर नागरिक जे स्टॅण्ड वर वाहन ठेवतील त्यांचे कडून म.न.पा. कार्यालये व दैनिक व आठवडी बाजारा करिता | प्रति सायकल<br>प्रति दिन | 1.00 रूपये<br>(एक रूपये) | 2.00 रूपये<br>( दोन रूपये ) |
| | प्रति स्कुटर<br>प्रति दिन | 1.50 रूपये<br>(एक रूपये पन्नास पैसे) | 5.00 रूपये<br>(पाच रूपये ) |
| | प्रति कार/जीप<br>प्रति दिन | .................. | 10.00 रूपये<br>( दहा रूपये ) |

<u>ठराव क्रमांक 55</u> :– स्थायी समिती ठराव क्र. 688 दिनांक 27.02.2009 अन्वये मंजुर प्रस्तावास मे. दिनेश राठी ॲन्ड असोसीएट्स यांचे कडुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियांनातर्गत वित्तीय सहायता उपलब्ध करवून घेण्याकरीता विस्तृत आराखडा तयार करण्या करीता त्यांना केन्द्र शासनाचे जेएनएनयुआरएम द्वारा मंजुर Final Detailed Project Report मध्ये येणारी actual Buses करीताची प्राकलनीय रक्कम रुपये 63.60 कोटी च्या 1.25% फिस आणि या व्यतिरिक्त यावर लागणारा सेवाकर वेगळा देण्याबाबत च्या हया दुरुस्ती प्रस्तावास एकमताने मंजुरी प्रदान केली.

2) नागपूर महानगर परिवहन मर्यादित कंपनी स्थापन करणे, रजिस्ट्रार ऑफ कंपनी यांचे कार्यालयात पंजीयन करणे, Drafting Article of Association of Company इत्यादि अतिरिक्त काम मे. दिनेश राठी आणि असोसीएट्स यांचे कडुन या निविदा अंतर्गत करवुन घेण्या करीता रुपये 9,50,000/– च्या अतिरिक्त खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 56</u> :– वार्ड क्र. 17, साईनगर मराठी प्राथमिक शाळा भाडे तत्वावर असून एकूण शाळेचे क्षेत्रफळ 71.82 चौ. मीटर आहे. व घरमालकास दरमहा रु. 1750/– भाडे देण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, बांधकाम विभाग यांचे रेंट सर्टिफिकेट क्र. 4 (4)/7092/09 दि. 18.12.2009 अनुसार सदर शाळेकरिता वाढीव भाडे क्र. 3,540/– करण्यात आलेले आहे. सदर भाडयाचा कालावधी दि. 01.04.2007 ते 31.03.2010 पर्यंत आहे.

या अनुषंगाने दि. 01/04/2007 पासून घरमालकास भाडे दयावे. किंवा मा. स्थायी समिती यांनी प्रस्ताव मंजूर केलेल्या दिनांकापासून भाडे देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दिनांक 01.04.2010 पासुन भाडेवाड देण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 57</u> :– नागपूर महानगर पालिका, अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाकरीता बजट प्रावधान क्रमांक 570 मधून रु. 7,00,00,000/– (सात कोटी) च्या प्रावधान प्राप्त झालेले असुन 1 नग 35 मिटर उंच असलेले स्वदेशी (भारतीय बनावटीचे) टेलिस्कोपीक हायड्रालीक प्लेटफार्म चेचीससह फेब्रिकेशन करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | |
|---|---|---|
| 1) | 35 मिटर उंच असलेले स्वदेशी (भारतीय बनावटीचे) टेलिस्कोपीक आयड्रालीक प्लेटफार्म चेसीस सह | 1 नग रु. 5,00,00,000/– |
| | एकूण अपेक्षित खर्च | रु. 5,00,00,000/– |

<u>ठराव क्रमांक 58</u> :– धंतोली झोन क्र. 4, प्रभाग समिती ठराव क्र. 72 अन्वये अर्थसंकल्प 2010 मध्ये झोनल पदा अंतर्गतचे पुर्ननियोजन करण्याचे अधिकार प्रभाग समितीला देण्याबाबतचा ठराव मंजुर करण्यात आला आहे.

त्यानुसार प्रभाग समितीचे शिफारसीसह मा. स्थायी समितीद्वारे मंजुरी करुन सभागृहाकडे पाठविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन हा विषय कार्यालयास परत करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 59</u> :– धंतोली झोन क्र. 4, क्षेत्रीय कार्यालय करीता नागपूर महानगरपालिका सन 2010–2011 चे अंदाजपत्रका नुसार विविध झोनल पदा अंतर्गत कामाकरीता अर्थसंकल्पीय तरतुद रु. 292.87 लक्ष केलेली आहे. प्रस्तावित झोनल अर्थसंकल्पाला मंजुरी प्राप्त करण्याकरीता व मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदी मधील विविध पदाअंतर्गत आवंटीत राशीचे पुर्नःनियोजन करण्याचे अधिकार प्रभाग समितीला प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 11.06.2010, अन्वये मंजुर करण्यात आला असुन मा. स्थायी समितीचे मंजुरी नंतर म.न. पा. महासभेपुढे मंजुरी करीता पाठविण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्थसंकल्प 2010–2011 मध्ये प्रस्तावित करण्यांत आलेल्या क्षेत्रीय कार्यालयास दिलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानास रु. 292.87 लक्ष यास अधिन राहून पद क्र. 287, 327, 641 या पदात बदल न करता म.न.पा. सभागृहापूढे विषय प्रस्तावित करतांना वेगवेगळया पदशिर्षाअंतर्गत अर्थसंकल्पीय राशी स्पष्टपणे नमूद करुन तसा क्षेत्रीय अर्थसंकल्प म.न. पा. सभागृहापूढे सादर करण्याचा अधिकार प्रभाग समितीस प्रदान करण्यांत येतो तसेच सभागृहाची मंजूरी घेण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 60</u> :– वार्ड क्र.82, शिवाजीनगर उद्यानास सिवेज ट्रिटमेंट प्लान्टकरीता लागणाऱ्या आवश्यक साधनसामुग्रीचा पुरवठा व उभारणी करुन सयंत्र कार्यान्वयीत करण्यास व हयाची एक वर्षापर्यंत देखभाल करण्याच्या कामास्तव निविदा बोलविल्या असता मे. सन इनव्हिरो प्रा.लि. यांचेशी

दराठरावी झालेल्या चर्चेअंती त्यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.00 प्रतिशत कमी दराची रुपये 12,86,010/– च्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 61</u> :– वॉर्ड क्र. 86, अंबाझरी ले आऊट, वर्मा ले आऊट ना.सु.प्र. संकुल ते नागनदी पर्यंत पावसाळी नालीचे बांधकामास्तव मे. दीप कन्स्ट्रक्शन, यांना त्यांचे मंजूर निविदा दरावर उर्वरित कामाचा रु. 12.50 लक्ष राशीचा कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 62</u> :– रिझर्व्ह बॅक चौकातील प.पु.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या पुतळयाच्या परिसरातील आंतरील ग्रील व बाहेरील सुरक्षा भिंतीच्या कामास्तव रु. 18,17,103/– रकमेचे प्राकलनास मंजूरी प्रदान करणे तसेच हया कामास्तव वास्तुशास्त्रज्ञ श्री. उदय गजभिये यांची 2.5 टक्के दरावर नेमणूक करण्याचा त्याचप्रमाणे या कामाचे निम्नतम निविदाकार मे. राजेश कन्स्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 16 टक्के कमी दराची रु. 15,26,367/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यादेश राशी वर्ष 2010–2011 पर्यंत रु. 5.00 लक्ष सिमित ठेवण्याच्या अटीवर या विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 63</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांची देखभाली करीता स्थायी समिती ठराव 104 दि. 11.09.2007 अन्वये मंजूर कंत्राटदारांना प्रती झोन रु. 10 लक्ष प्रमाणे एकूण रु. 100 लक्षाचे कार्यादेश देण्यात आले होते त्यानंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढीव राशी करीता स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करुन स्थायी समिती ठराव क्र. 706 दि. 02.03.2009 अन्वये मंजूर कंत्राटदाराकडून माहे मार्च 2009 पर्यंत रु. 1.88 कोटी पर्यंतची कामे करण्यास मंजूरी प्राप्त आहे. नविन निविदेप्रमाणे कामे सुरु होईपर्यंत (दि. 15.06.2009) मंजूर कंत्राटदाराकडून आवश्यकतेनूसार देखभाल दुरुस्तीचे एकूण रु. 13,47,332/– चे करवून घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यास व या अनुषंगाने एकूण रु. 2,01,47,332/– च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा व विभागाने केलेली आवश्यक कार्यवाही नियमीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 64</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांची दुरुस्तीकरीता स्विच गियर्स (कॉन्टॅक्टर्स–टाईमर्स इत्यादी) खरेदी करण्यास्तव ई–निविदा बोलाविल्या असता प्राप्त निविदांपैकी मे. मेट्रो इलेक्ट्रिकल्स लि. यांचे सुधारीत निम्नतम दर मंजूर करण्याचा व रु. 14,94,413/– या राशीपर्यंत खर्च सिमीत ठेऊन आवश्यकतेनुसार साहित्याचा पुरवठा करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 65</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करीता गॅग व किरकोळ साहित्य पूरवठा करण्याकरीता 'शिडी–गाडी' व 'डब्लू.पी.टी.सी.' चे दर वगळता प्राकलनीय दरापेक्षा 1% ने कमी असलेली निविदा दर मंजूर करण्याचा व खालील नमूद केल्यानुसार झोन निहाय रु. 46,31,522/– चे काम करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय एकमताने मंजूर, तसेच टिप मधील क्र. 3 जर कंत्राटदार प्राकलनिय दरावर शिडी गाडी उपलब्ध करुन देण्यास तयार असतील तर त्यांच्याशी विभागाने चर्चा करावी व त्यानंतर फेरनिविदा बोलवाव्या असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

| निविदाकाराचे नांव | नांव व झोन क्र. |
|---|---|
| मे. साधना इलेक्ट्रिक वर्कस् | लक्ष्मीनगर झोन क्र. 1 |
| मे. बालाजी असोसीऐटस् | धरमपेठ झोन क्र. 2 |
| मे. सोनू इलेक्ट्रीकल्स | हनुमाननगर झोन क्र. 3 |
| मे. अनिल इलेक्ट्रिकल्स ॲण्ड असोसीऐटस् | धंतोली झोन क्र. 4 |
| मे. अनिल इलेक्ट्रिकल्स ॲण्ड असोसीऐटस | नेहरु नगर झोन क्र. 5 |
| मे. लिंक इंटरप्राईजेस् | महाल झोन क्र. 6 |
| मे. सोनू कलेक्ट्रिकल्स | सतरंजीपूरा झोन क्र. 7 |
| मे. राहूल कन्स्ट्रक्शनस् | लकडगंज झोन क्र. 8 |
| मे. व्ही.एस. इंटरप्राईजेस् | आसीनगर झोन क्र. 9 |
| मे. दत्त इलेक्ट्रिकल्स | मंगळवारी झोन क्र. 10 |

टिप क्र. 3 :– शिडी–गाडीचे निम्नतम प्राप्त दर प्राकलनीय दरापेक्षा 52% ने जास्त असल्यामुळे फक्त शिडी–गाडी उपलब्ध करवून देण्याच्या कामाकरिता फेर निविदा बोलविण्यात येत आहेत.

<u>ठराव क्रमांक 66</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता विविध साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता ई–निविदा बोलाविल्या असता प्राप्त निविदापैंकी मे. क्रॉम्टन ग्रीव्हज लि., मे. सुर्या रोशनी लि., मे. ओसराम (इंडिया) प्रा.लि. व मे. बजाज इलेक्ट्रिकल्स लि. यांचे प्राकलनीय दरांच्या तुलनेत 0.0% ते 28.57% ने कमी दर असलेले सुधारीत निविदा दर मंजूर करुन शक्यतो समप्रमाणात आवश्यकतेनुसार रु. 85,05,473/– पर्यंत खर्च सिमीत ठेऊन हे काम करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

++ ++ ++

**<u>ठराव क्रमांक 67</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | अध्यक्ष<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |